# ठाकरे गटाच्या जिल्हाध्यक्षांच्या घर–कार्यालयावर ईडीची धाड

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर कारवाई; राजकीय वर्तुळात खळबळ, 'टायमिंग'वर प्रश्न

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांची रणधुमाळी शिगेला पोहोचलेली असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. मतदानाला अवघे सहा दिवस बाकी असताना नागपूर जिल्ह्यातील ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष उत्तम कापसे यांच्या घर व कार्यालयावर Enforcement Directorate (ED) ने पहाटे धाड टाकल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

नागपूर जिल्ह्यातील सावनेर, खापा आणि पाटणसावंगी परिसरात ईडीची जोरदार कारवाई सुरू असून, नागपूर व दिल्ली येथील ईडीच्या तब्बल १० पथकांनी एकाच वेळी छापेमारी केल्याची माहिती समोर आली आहे. पहाटे सुमारे ५ वाजल्यापासून सुरू झालेल्या या कारवाईमुळे संबंधित भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

या छापेमारीमागे २०२१ मधील रेती तस्करी आणि बेकायदेशीर रेती विक्री प्रकरण असल्याचे सांगितले जात आहे. चार वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात झालेल्या रेती विक्रीतील कथित गैरव्यवहाराचा तपास पुन्हा एकदा गती घेत असल्याचे संकेत मिळत आहेत. आर्थिक व्यवहारांची साखळी, व्यवहारातील मध्यस्थी आणि पैशांचा प्रवाह—या साऱ्यांचा तपास ईडीकडून काटेकोरपणे सुरू असल्याची माहिती



सूत्रांकडून मिळत आहे.

कारवाईदरम्यान सावनेरमध्ये प्रफुल्ल कापसे, उत्तम कापसे, विनोद गुप्ता, लक्ष्मीकांत सातपुते आणि दादू कोलते, तर पाटणसावंगी येथे शरद राय आणि मनोज गायकवाड, तसेच खापा येथे अमित राय यांच्या घर व कार्यालयांवर ईडीने छापेमारी केली आहे. कागदपत्रे, डिजिटल नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू असून, काही महत्त्वाची माहिती ताब्यात घेतल्याचीही चर्चा आहे.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाच्या जिल्हाध्यक्षांवर ईडीची धाड पडल्याने कारवाईच्या 'टायमिंग'वरून राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विरोधकांकडून "कायदा आपलं काम करतोय" अशी प्रतिक्रिया येत असताना, ठाकरे गटाच्या गोटातून मात्र राजकीय दबावाखालील कारवाई असल्याचा सूचक आरोप केला जात आहे. "निवडणुकीच्या तोंडावरच अशा धाडी का?" असा सवाल उपस्थित केला जात असून, या कारवाईचा प्रचारावर आणि कार्यकर्त्यांच्या मनोबलावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, ईडीकडून अद्याप अधिकृत निवेदन आलेले नसले, तरी तपास मनी ट्रेल आणि संबंधित व्यवहारांच्या कड्या जोडण्यावर केंद्रित असल्याचे समजते. चौकशीची पुढील पावले काय असणार, कोणाची जबाब नोंदवली जाणार, आणि आणखी कोणत्या ठिकाणी छापेमारी होणार—याबाबत प्रचंड उत्सुकता आहे.

एकीकडे निवडणुकांचे रणांगण तापलेले असताना, दुसरीकडे कायदा–राजकारणाचा संघर्ष पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. ही कारवाई केवळ तपासाचा भाग ठरणार, की ठाकरे गटासाठी नवे राजकीय आव्हान उभे करणार— याचे उत्तर येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे. तोपर्यंत, नागपूरपासून राज्यभर या छापेमारीच्या पडसादांनी राजकीय वातावरण अधिकच ढवळून निघणार, हे मात्र नक्की.

# ISVIR महाराष्ट्रची नूतन कार्यकारिणी जाहीर

## विना-शस्त्रक्रिया उपचार क्रांतीचा राज्यभर विस्तार करण्याचा निर्धार

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाची घडामोड ठरली असून Indian Society of Vascular and Interventional Radiology (ISVIR) च्या महाराष्ट्र शाखेची २०२५–२६ या कालावधीसाठी नूतन कार्यकारिणी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. राजेश मुंडादा (नागपूर) यांच्या देखरेखीखाली बिनविरोध व एकमताने पार पडली. या बिनविरोध निवडीतून महाराष्ट्रातील इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी क्षेत्रातील डॉक्टरांमधील व्यावसायिक सलोखा, संघटनात्मक एकजूट आणि सामूहिक दृष्टीकोन अधोरेखित झाला आहे.

या नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी डॉ. अविनाश गुट्टे यांची निवड करण्यात आली आहे. ते Grant Medical College & JJ Hospital, मुंबई येथे प्राध्यापक व इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. सचिवपदाची धुरा डॉ. शिवाजी पोळे यांच्याकडे सोपवण्यात आली असून ते MGM Hospital, छत्रपती संभाजीनगर येथे विभागप्रमुख आहेत.

उपाध्यक्षपदी डॉ. विवेक उकिरडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते LT Medical College & Sion Hospital, मुंबई येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. आगामी कार्यकाळातील अध्यक्ष (President-Elect) म्हणून डॉ. यादव मुंडे यांची निवड करण्यात आली असून ते Ruby Hall Clinic, पुणे येथे इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी विभागप्रमुख आहेत.

कोषाध्यक्षपदी डॉ. तेजस सदावर्ते (जीएमसी, नागपूर) यांची निवड करण्यात आली आहे. तसेच सह-सचिव म्हणून डॉ. पृथ्वीराज जाधव आणि डॉ. स्वेनिल शाह यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासोबतच मुंबई, नागपूर, चंद्रपूर आणि छत्रपती संभाजीनगर येथील अनुभवी व नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांची कार्यकारिणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली असून, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे भौगोलिक व वैद्यकीय प्रतिनिधित्व या नूतन कार्यकारिणीत साध्य झाले आहे. १९९७ साली अवघ्या २८ सदस्यांपासून सुरू झालेल्या ISVIR संस्थेने आज १,२०० हून अधिक राष्ट्रीय सदस्यसंख्या गाठली आहे. इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी ही 'पिनहोल' तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक उपचारपद्धती असून, मेंदूतील स्ट्रोक, रक्तवाहिन्यांचे आजार, व्हेरिकोज व्हेन्स तसेच कॅन्सरसारख्या गंभीर आजारांवर विना-शस्त्रक्रिया, कमी वेदनादायक आणि कमी कालावधीतील उपचार देणे शक्य झाले आहे. रुग्णालयात कमी दिवस राहणे, जलद बरे होणे आणि उपचार खर्चात बचत होणे, हे या पद्धतीचे मोठे फायदे आहेत. नूतन कार्यकारिणीने पुढील कार्यकाळात प्रशिक्षण, संशोधन आणि उपचारांचा विस्तार या तीन प्रमुख उद्दिष्टांवर भर देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. महाराष्ट्रातील जिल्हा व तालुका पातळीपर्यंत इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी सेवा पोहोचवणे, तरुण डॉक्टरांना जागतिक दर्जाचे प्रशिक्षण देणे आणि सर्वसामान्य रुग्णांना या जीवनरक्षक उपचारांचा लाभ मिळवून देणे, हा या कार्यकारिणीचा मुख्य अजेंडा असणार आहे.

# स्वच्छ व शुध्द पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेची अधिक दक्ष कार्यवाही

**नवी मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

स्वत:च्या मालकीच्या मोरबे धरण प्रकल्पामुळे जलसंपन्न शहर अशीही नवी मुंबईची ओळख असून नागरिकांना समाधानकारक स्वच्छ व शुध्द पाणी पुरवठा स्वरुपात पुरविण्यातही नवी मुंबई महानगरपालिका आघाडीवर आहे. याकरिता महानगरपालिकेच्या वतीने पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता नियमितपणे व सातत्याने तपासली जात असते.

तथापि इंदोर शहरात नुकत्याच पिण्याच्या पाण्यातून घडलेली दुर्घटना बघता पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी व सांडपाण्याची वाहिनी जवळजवळ असल्यास अशाप्रकारची दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेत नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नमुंमपा क्षेत्रात याद्दष्टीने संपूर्ण काळजी घेत



आवश्यक ती अधिकची खबरदारी घेण्याच्या तसेच जल संकलन, साठा व वितरण व्यवस्थेमधील सर्व स्तरावर तातडीने उपाययोजना करणेबाबत सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागास निर्देश दिले.

आयुक्त महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार अतिरिक्त शहर अभियंता स्थापत्य श्री.अरविंद शिंदे यांनी महानगरपालिकेचे संबधित सर्व अभियंते व कंत्राटदार यांची तातडीने विशेष बैठक घेत महानगरपालिकेच्या मोरबे धरण जलाशयापासून भोकरपाडा जल शुध्दीकरण केंद्र व पुढे मुख्य जलवाहिनी तसेच जलउदंचन केंद्रे आणि जलवाहिन्या व वितरण व्यवस्थेमधील शेवटच्या लाभार्थी घटकापर्यंत जल व्यवस्थापनाच्या सर्व बाबींची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यास अनुसरुन त्वरित कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली आहे.

# महानगरपालिका कार्यक्षेत्रात मतदार माहिती चिठ्ठ्यांचे आजपासून घरोघरी वितरण

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ – २६ च्या अनुषंगाने येत्या गुरुवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांचे नाव, पत्ता, मतदार यादीतील भाग क्रमांक, मतदान केंद्राचे नाव व खोली क्रमांक यांसह आवश्यक माहिती असलेली मतदार माहिती चिठ्ठी (Voter Information Slip) वितरणाची प्रक्रिया दिनांक ९ जानेवारी २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे. मतदारांची कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी मुंबईतील प्रत्येक पात्र मतदारापर्यंत निर्धारित कालावधीत मतदार माहिती चिठ्ठी वेळेत व अचूकरीत्या पोहोचावी, याकामी अत्यंत सूक्ष्म व प्रभावी नियोजन करावे, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी दिले आहेत. मतदारांनी समन्वय साधून आपली मतदार माहितीचिठ्ठी प्राप्त करून घ्यावी व गुरूवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहनदेखील डॉ. जोशी यांनी केले आहे.

माननीय राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार मतदारांना आपले मतदान केंद्र, मतदार यादीतील क्रमांक आदी माहिती सुलभरित्या उपलब्ध होण्यासाठी मतदार माहिती चिठ्ठ्या दिल्या जातात. मतदारांपर्यंत ह्या चिठ्ठ्या त्या त्या प्रशासकीय विभागात (वॉर्ड) नियुक्त घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकारी - कर्मचारी यांच्यामार्फत वितरीत करण्यात येत आहेत. या वितरण कार्यवाहीस शुक्रवार, दिनांक ९ जानेवारी २०२६ पासून सुरूवात झाली आहे. मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदार माहिती चिठ्ठ्या पोहोचविण्याच्या या कार्यवाहीचा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी विविध निर्देश दिले.

विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) श्री. विजय बालमवार, सहआयुक्त (करनिर्धारण व संकलन) श्री. विश्वास शंकरवार, उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थालपन) श्री. किरण दिघावकर, सहायक आयुक्त (करनिर्धारण व संकलन) श्री. गजानन बेल्लाळे यांच्यासह परिमंडळ उप आयुक्त, प्रशासकीय विभागांचे सहायक आयुक्त, २३ निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासह घनकचरा व्यवस्थापन विभाग व करनिर्धारण व संकलन विभागाचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते.

अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी यांनी सांगितले की, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदारांना मतदान प्रक्रिया अधिक सुलभ व सोयीस्कर व्हावी, या उद्देशाने मतदानापूर्वी काही दिवस अगोदर मतदारांची नावे, त्यांचा अनुक्रमांक, प्रभाग क्रमांक, प्रभागाचे नाव आदी तपशील असलेली मतदार चिठ्ठी वितरित करण्यात येते. मतदारांना मतदान करणे सोपे व्हावे तसेच एकूण मतदानाची टक्केवारी वाढावी, या दृष्टीने हा वैधानिक उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागातील सहायक अभियंता, अवेक्षक तसेच करनिर्धारण व संकलन विभागाचे निरीक्षक यांच्या समन्वयाने मतदार माहिती चिठ्ठी घरोघरी पोहोचविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. मुंबईतील एक कोटीहून अधिक मतदारांपर्यंत ही माहिती पोहोचविण्याचे महानगरपालिकेचे उद्दिष्ट आहे. मुंबईतील प्रत्येक पात्र मतदारापर्यंत निर्धारित कालावधीत मतदार माहिती चिठ्ठी वेळेत व अचूकरीत्या पोहोचेल, यासाठी अत्यंत सूक्ष्म, प्रभावी व काटेकोर नियोजन राबविण्यात यावे, असे निर्देश डॉ. जोशी यांनी दिले आहेत.

प्रशासकीय विभागातील सहायक आयुक्तांनी मतदार माहिती चिठ्ठी वितरणाच्या कार्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांना आवश्यक कामकाज नेमून द्यावे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चिठ्ठ्यांची प्रभागनिहाय विभागणी करून प्रत्येक मतदारापर्यंत त्या घरपोच पोहोचविण्याची कार्यवाही करावी. मतदार चिठ्ठी अन्य व्यक्तींकडे न देता मतदार किंवा कुटुंबप्रमुखाकडे द्यावी. घनकचरा व्यवस्थापन विभागातील कनिष्ठ अवेक्षकांनी विभाग निरीक्षकांच्या समन्वयाने तसेच उपलब्ध कामगारांच्या सहाय्याने, संबंधित विभागातील गृहनिर्माण संस्थांचे अध्यक्ष, बिगर शासकीय संस्था तसेच सामाजिक व अराजकीय संस्थांचे प्रतिनिधी यांच्यामार्फत मतदार माहिती चिठ्ठी वितरणाबाबत आवश्यक सूचना द्याव्यात. या संपूर्ण कार्यवाहीचा दैनंदिन अहवाल दररोज निवडणूक मुख्य कार्यालयाकडे सादर करण्यात यावा. तसेच या वितरण प्रक्रियेचे प्रभावी पर्यवेक्षण संबंधित प्रशासकीय विभागातील घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सहायक अभियंता, पर्यवेक्षक व विभाग निरीक्षक यांनी करावे, असे निर्देश डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले आहेत.

# नवी मुंबईतील शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का!

**नवी मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका राजकीय वातावरण तापले असून शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसल्याची चर्चा आहे. सानपाडा प्रभाग क्रमांक १९ मध्ये शिवसेनेचे तीन उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असताना, या प्रभागातील प्रभावी नेते मिलिंद सूर्यराव यांनी उघड नाराजी व्यक्त केली आहे.

शिंदे गटाची स्थापना झाल्यापासून आपण पक्षासोबत प्रामाणिकपणे काम केले, मात्र अचानक पक्षात आलेल्या नव्या लोकांना उमेदवारी देण्यात आली, असा गंभीर आरोप मिलिंद सूर्यराव यांनी केला आहे. या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला असून, प्रभागातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मिलिंद सूर्यराव आणि त्यांचे सहकारी काल भाजपमध्ये प्रवेश करून भाजपाचा प्रचार करणार आहे. त्यांच्या प्रवेशामुळे सानपाडा प्रभागातील शिवसेना शिंदे गटाच्या उमेदवारांना मोठा फटका बसणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

नवी मुंबई महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश भाजपासाठी बळकटी देणारा तर शिवसेना शिंदे गटासाठी चिंतेचा विषय ठरणार आहे.

# आयआयटी मुंबईमध्ये 'परम रुद्र' सुपरकॉम्प्युटर कार्यान्वित; सी-डॅकच्या माध्यमातून उभारणी

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मुंबई येथे देशांतर्गत तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक 'परम रुद्र' सुपरकॉम्प्युटिंग सुविधा कार्यान्वित करण्यात आली. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव प्रा. अभय करंदीकर यांच्या हस्ते या सुविधेचे उद्घाटन करण्यात आले. ही प्रणाली सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडव्हान्स्ड कम्प्युटिंग (सी-डॅक) यांच्या माध्यमातून उभारण्यात आली आहे.




३ पेटा फ्लॉप्स क्षमतेची ही उच्च कार्यक्षम संगणकीय प्रणाली राष्ट्रीय सुपरकॉम्प्युटिंग मिशनअंतर्गत बिल्ड ॲप्रोच पद्धतीने विकसित करण्यात आली आहे. 'परम रुद्र' हा सी-डॅकने स्वदेशी पातळीवर डिझाइन केलेल्या रुद्र सर्व्हर्सवर आधारित आहे. त्यांचे उत्पादन भारतातच करण्यात आले आहे. त्यामुळे 'मेक इन इंडिया' उपक्रमाला चालना मिळाली आहे.

या प्रणालीत सी-डॅकच्या स्वदेशी सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला आहे. ऊर्जा कार्यक्षमतेसाठी डायरेक्ट कॉन्टॅक्ट लिक्विड कूलिंग तंत्रज्ञानाचा यात समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रीय सुपरकॉम्प्युटिंग मिशन हे इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आणि विज्ञान व तंत्रज्ञान विभाग यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली राबवले जात आहे. सी-डॅक आणि आयआयएससी बंगळुरू या संस्थांच्या माध्यमातून या उपक्रमाची अमलबजावणी करण्यात येत आहे. स्वदेशी सुपरकॉम्प्युटिंगचे जाळे उभारणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

परम सुपरकॉम्प्युटरमुळे आयआयटी मुंबईतील सुमारे २०० हून अधिक प्राध्यापक आणि १ हजार २०० विद्यार्थी तसेच देशभरातील संशोधकांना प्रगत संगणकीय संशोधनासाठी मोठी मदत होणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि प्रगत उत्पादन तंत्रज्ञान या क्षेत्रांतील संशोधनाला यामुळे गती मिळेल, तसेच स्टार्टअप्स आणि उद्योगाभिमुख संशोधनालाही पाठबळ मिळेल, असे प्रा. अभय करंदीकर यांनी यावेळी सांगितले.

रुद्र आधारित क्लस्टर हा भारताच्या स्वदेशी सुपरकॉम्प्युटिंग प्रवासातील महत्त्वाचा टप्पा आहे. भविष्यात एक्सास्केल संगणनाकडे वाटचाल करण्यासाठी एचपीसी प्रणाली, सॉफ्टवेअर, मायक्रोप्रोसेसर आणि नेटवर्किंगमध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक आवश्यक असल्याचे इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या समूह समन्वयक सुनीता वर्मा यांनी सांगितले.

'परम रुद्र'च्या समावेशामुळे देशभरात आतापर्यंत ३८ सुपरकॉम्प्युटर्स सुरू करण्यात आले आहेत. त्यांची एकूण संगणकीय क्षमता ४४ पेटा फ्लॉप्स इतकी झाली आहे. आयआयटी मुंबईतील ही सुविधा मुंबई व परिसरातील विविध संस्थांच्या संशोधन क्षमतेत वाढ करेल आणि सहकार्यात्मक वैज्ञानिक संशोधनाला चालना देईल, असे मत राष्ट्रीय सुपरकॉम्प्युटिंग मिशनचे मिशन संचालक डॉ. हेमंत दरबारी यांनी मांडले.

# नवी मुंबईत १६ लाख १६ हजारची रोकड जप्त



**नवी मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 मध्ये आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन होण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिकेने शहरात प्रवेशाच्या तसेच मुख्य विविध 9 ठिकाणी दिवसाच्या तिन्ही सत्रांमध्ये 24 तासात 27 स्थिर संनिरीक्षण पथके (SST Team) स्थापन केलेली आहेत. या पथकांमार्फत वाहने व इतर बाबींवर काटेकोर लक्ष ठेवण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार, आचारसंहिता कक्षाचे मुख्य सनियंत्रण अधिकारी श्री. सुनील पवार यांचे मार्गदर्शनाखाली, दि. 9 जानेवारी रोजी, दुपारी 12.30 वा. दरम्यान एपीएमसी मार्केट जवळील चेक पोस्टवर आचार संहिता कक्षाचे नोडल अधिकारी उपआयुक्त डॉ.अमोल पालवे व परिवहन उपक्रमाचे मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी श्री.तुषार दौंडकर तसेच प्रशासकीय अधिकारी श्री.संजीव पवार यांच्या नियंत्रणाखाली एकूण रू. १६,१६,०००/ - इतक्या किंमतीची रोकड पकडण्यात आली आहे. याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.


ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 8451942710| Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **ARGFL/SME-LAP/MUM/1179** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger. net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मे. एसकेआरके अँड कंपनी (कर्जदार) ४०१, चौथा मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्रमांक ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२.

सह–कर्जदाराचे नाव: (२) मे. पवनसुत एंटरप्रायझेस (सह–कर्जदार) दुकान क्रमांक ०२, प्लॉट क्रमांक ११८, गोराई सन्मित्र सीएचएसएल, मंगल मूर्ती हॉस्पिटल रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२. (३) श्री राजेश जैस्वाल (सह कर्जदार) ४०१, ४था मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२. (४) श्रीमती मनजीत राजेश जैस्वाल (सह कर्जदार) ४०१, ४था मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२. (५) श्री. संजीत राजेश जैस्वाल (सह–कर्जदार) ४०१, चौथा मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०००९२. (६) श्रीमती आशादेवी जैस्वाल (सह–कर्जदार) ४०१, ४था मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२.

मालमत्तेचा पत्ता: दुकान क्रमांक २, तळमजला, प्लॉट क्रमांक ११८, गोराई सन्मित्र सीएचएसएल, मंगल मूर्ती हॉस्पिटल रोड, मंगल मूर्ती हॉस्पिटल जवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२

| | |
|---|---|
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | ७२,६९,७७७/– (बाहत्तर लाख एकोणसत्तर हजार सातशे सात्यात्तर रुपये फक्त) |
| लिलावाची तारीख | १३ फेब्रुवारी २०२६ |
| राखीव किंमत | रु. ७२,९०,०००/– (रुपये बहात्तर लाख आणि नव्वद हजार फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | १०,०००/– (दहा हजार रुपये फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | ६ फेब्रुवारी २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | ११ फेब्रुवारी २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १३ फेब्रुवारी २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ९ जानेवारी २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता



ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Phone: +91 8451942710| Website: www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **ARGFL/SME-LAP/MUM/1179** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger. net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नाव: (१) मे. एसकेआरके अँड कंपनी (कर्जदार) ४०१, चौथा मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्रमांक ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२.

सह–कर्जदाराचे नाव: (२) मे. पवनसुत एंटरप्रायझेस (सह–कर्जदार) दुकान क्रमांक ०२, प्लॉट क्रमांक ११८, गोराई सन्मित्र सीएचएसएल, मंगल मूर्ती हॉस्पिटल रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२. (३) श्री राजेश जैस्वाल (सह कर्जदार) ४०१, ४था मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२. (४) श्रीमती मनजीत राजेश जैस्वाल (सह कर्जदार) ४०१, ४था मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२. (५) श्री. संजीत राजेश जैस्वाल (सह–कर्जदार) ४०१, चौथा मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०००९२. (६) श्रीमती आशादेवी जैस्वाल (सह–कर्जदार) ४०१, ४था मजला, गोराई सन्मित्र सीएचएसएल, प्लॉट क्र. ११८, गोराई, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२.

मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट क्र. ४०१, चौथा मजला, प्लॉट क्र. ११८, गोराई सन्मित्र सीएचएसएल, आरएससी ३७, गोटाई भाग २, मंगल मूर्ती हॉस्पिटलजवळ, बोरिवली (पश्चिम), मुंबई: ४०० ०९२.

| | |
|---|---|
| थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह) | ७२,६९,७७७/– (बाहत्तर लाख एकोणसत्तर हजार सातशे सात्यात्तर रुपये फक्त) |
| लिलावाची तारीख | १३ फेब्रुवारी २०२६ |
| राखीव किंमत | १,१०,६२,०००/– (एक कोटी दहा लाख बासष्ट हजार रुपये फक्त) |
| कमाईची रक्कम ठेव | राखीव किमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | १०,०००/– (दहा हजार रुपये फक्त) |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ | ६ फेब्रुवारी २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत |
| केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी. | ११ फेब्रुवारी २०२६ दुपारी ४.०० वाजेपर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | १३ फेब्रुवारी २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: ९ जानेवारी २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता


# जिजाऊ जन्मोत्सव चार दिवसांवर, तरीही प्रशासन ढिम्म

## पालकमंत्र्यांच्या दुर्लक्षावर मराठा क्रांती मोर्चा संतप्त; आंदोलनाचा इशारा


**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊंच्या जन्मभूमीवर दरवर्षी लाखो भाविकांना साद घालणारा जिजाऊ जन्मोत्सव अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपला असतानाही प्रशासन आणि राजकीय नेतृत्वाकडून दिसणारी उदासीनता आता उघडपणे समोर आली आहे. बुलढाणा सिंदखेड येथे १२ जानेवारीला साजरा होणाऱ्या या ऐतिहासिक सोहळ्याच्या नियोजनाकडे दोन्ही पालकमंत्र्यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत मराठा क्रांती मोर्चा आक्रमक झाला आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी अद्यापपर्यंत जिजाऊ जन्मोत्सवाच्या संदर्भात एकही आढावा बैठक घेतलेली नाही, असा गंभीर आरोप मराठा क्रांती मोर्चाने केला आहे. जन्मोत्सवासाठी देशभरातून येणाऱ्या लाखो जिजाऊ भक्तांसाठी वाहतूक, पाणी, स्वच्छता, निवास, आरोग्य व सुरक्षेच्या मूलभूत सुविधा पुरवण्यात आल्याच नसल्याचा दावा करण्यात आला आहे.

मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक यांनी थेट सरकार आणि प्रशासनावर हल्लाबोल करत सांगितले की, "राजमाता जिजाऊ या केवळ एका समाजाच्या नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या प्रेरणास्थान आहेत. मात्र त्यांच्या जन्मोत्सवाच्या नियोजनाबाबत प्रशासनाची बेफिकिरी अत्यंत लज्जास्पद आहे."

विशेष म्हणजे, जिल्ह्याला दोन पालकमंत्री देण्यात आले असताना—दुसरे सहपालकमंत्री संजय सावकारे असताना—इतक्या मोठ्या राष्ट्रीय पातळीवरील सोहळ्याची कोणतीही



ठोस तयारी नसणे, हा राजकीय इच्छाशक्तीच्या अभावाचा स्पष्ट पुरावा असल्याचा संतप्त आरोप होत आहे.

दरवर्षी जिजाऊ जन्मोत्सवानिमित्त सिंदखेडराजा येथे महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून लाखो भाविक दाखल होतात. मात्र यंदा जन्मोत्सव तोंडावर आला असताना देखील भाविकांसाठी एकही ठोस सुविधा प्रत्यक्षात दिसत नसल्याने नाराजीचा सूर वाढला आहे. यामुळे भाविकांची गैरसोय होण्याची दाट शक्यता असून, कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, असा इशारा मराठा क्रांती मोर्चाने दिला आहे.

यावर समृद्धी महामार्गालगत राजमाता जिजाऊ आणि बाल शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचा निर्णय सरकारने जाहीर करूनही अद्याप प्रत्यक्षात तो पुतळा उभा राहिलेला नाही. या आश्वासनपूर्तीतील दिरंगाईवरून मराठा क्रांती मोर्चाने सरकारचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. "घोषणा करण्यात पटाईत असलेले सरकार प्रत्यक्ष कामात मात्र अपयशी ठरत आहे," असा टोला आंदोलनकर्त्यांनी लगावला.

जिजाऊंच्या विचारांचे स्मरण करण्याच्या ऐतिहासिक क्षणीही जर शासन आणि राजकीय नेतृत्व उदासीन राहत असेल, तर ते जिजाऊंच्या स्मृतींचा अपमान असल्याची भावना आता उघडपणे व्यक्त होत आहे. त्यामुळे मराठा क्रांती मोर्चाने येत्या काही दिवसांत मोठ्या आंदोलनाचा इशारा दिला असून, वेळेत सुविधा उपलब्ध न झाल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा ठाम निर्धार त्यांनी जाहीर केला आहे.

अवघ्या चार दिवसांवर आलेल्या जिजाऊ जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सरकार जागे होणार का, की हा पवित्र सोहळा पुन्हा एकदा प्रशासनिक निष्क्रियतेचा बळी ठरणार—याकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून आहे.